दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६ (The Rights of Persons with Disability Act, 2016) नुसार दिव्यांग विद्यार्थ्यांच्या प्रवेशाशी संबंधित सर्व बाबींबाबत आणि अधिनियमातील कलम १६, १७ व ३१ अन्वये शाळांमध्ये उपलब्ध करून द्यावयाच्या सोयी सुविधांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरावर सहसंचालक (प्रशासन), शिक्षण आयुक्तालय, पुणे व जिल्हा/मनपा स्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.) यांना नोडल तसेच कलम २३ अन्वये तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्त करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०१९/प्र.क्र.७६/एसडी-६**
**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक:- ३० जुलै, २०१९**

संदर्भ:-१) केंद्र शासनाचा दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६ दिनांक २८ डिसेंबर, २०१६.
२) केंद्र शासनाची दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६ ची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजीची अधिसूचना.
३) सामाजिक न्याय व अधिकारीता, मंत्रालय, नवी दिल्ली यांची दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६ च्या नियमाबाबत दिनांक १५ जून, २०१७ रोजीची अधिसूचना.
४) सामाजिक न्याय व अधिकारीता, मंत्रालय, नवी दिल्ली यांची दि. ०४/०१/२०१८ रोजीची अधिसुचना दिव्यांग वैद्यकीय मुल्यमापन व प्रमाणिकरण प्रक्रियाबाबत मार्गदर्शक तत्वेबाबत अधिसुचना.
५) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अप्रवि - २०१८/शासन परिपत्रक प्र.क्र. ४६ / आरोग्य दि. १४/०९/२०१८ (दिव्यांग वैद्यकीय मुल्यमापन व प्रमाणिकरण प्रक्रियाबाबत मार्गदर्शक सुचना)
६) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१७ / (११८/१७) एस.डी. ६ दि. १६/१०/२०१८ (विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या मुल्यांकन व शैक्षणिक सवलतीबाबत.)
७) सामाजिक न्याय व अधिकारीता, मंत्रालय, नवी दिल्ली यांची दि. २२/१०/२०१८ रोजीची अधिसुचना (अतीतीव्र दिव्यांग व्यक्तीच्या गरजांबाबत अधिसुचना.)
८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. अपंग २०१३/प्र. क्र. २०१/ अ.क.२ दि.२०/०२/२०१९ दिव्यांग व्यक्तीसाठी महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण २०१८ ची अंमलबजावणी करण्याबाबत.

**प्रस्तावना:-**

दि. २८ डिसेंबर, २०१६ रोजी केंद्र शासनाद्वारे Right of Person with Disability (RPWD) Act, २०१६ अमलात आला आहे. या अधिनियमातील प्रकरण, २ कलम -३ पक्षपात व भेदभाव न करणे, प्रकरण-३, शिक्षण कलम १६,१७ व प्रकरण ६ कलम ३१ अन्वये RTE Act, २००९ चा संदर्भ नमूद करुन विशेष गरजा असणाऱ्या बालकांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता पुढील दर्शविलेल्या २१ प्रकारातील विशेष गरजा असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना (दिव्यांग) समावेशित शिक्षणाद्वारे शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणावयाचे आहे.

1) Loco motor Disability (लोकोमोटर डिसॅबिलिटी)
2) Leprosy Cured Person (कुष्ठरोग निवारित)
3) Cerebral Palsy (सेरेब्रल पाल्सी)
4) Dwarfism (शारिरीक वाढ खुंटणे)
5) Muscular Dystrophy (स्नायूंची विकृती)
6) Acid Attack Victims (ॲसिड अटॅक व्हिक्टीम)
7) Blindness (पूर्णत:अंध)
8) Low Vision (अंशत:अंध)
9) Hearing Impaired (कर्णबधिर)
10) Speech and Language Disability (वाचा व भाषा)
11) Intellectual Disability (बौद्धिक अक्षम)
12) Specific Learning Disability (विशेषत: अध्ययन अक्षम)
13) Autism Spectrum Disorder (स्वमग्न)
14) Mental Behavior (मानसिक वर्तन)- Mental Illness (मानसिक आजार)
15) Multiple Sclerosis मल्टीपल स्क्लेरोसीस
16) Parkinson`s (पार्किंसन्स)
17) Hemophilia (हिमोफिलीया)
18) Thalassemia (थॅलस्सेमिया)
19) Sickle Cell Disease (सिकल सेल आजार)
20 Chronic Neurological conditions
21) Multiple Disabilities (बहुविकलांग)

केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ (RPWD Act. २०१६) सर्वत्र लागू करून राबविण्याबाबत दि. १९/०४/२०१७ रोजी उपरोक्त संदर्भिय क्र. २ अन्वये अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली आहे. दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ (RPWD Act. २०१६) मधील प्रकरण ३ शिक्षण, कलम १६, १७ व ३१ मध्ये नमूद असलेल्या बाबींची जबाबदारी ही शालेय शिक्षण व क्रीडा विभागावर निश्चित करण्यात आलेली आहे.

केंद्रशासनाने सदर कलमांची पुर्तता क्षेत्रिय स्तरावर जिल्हा महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुलभपणे पार पाडण्यासाठी उपरोक्त संदर्भाधिन क्रमांक ३ अन्वये दि. १५ जून, २०१७ रोजीच्या अधिसूचनांन्वये जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयाद्वारे दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६ (The Rights of Persons with Disability Act, २०१६) नुसार दिव्यांग विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबंधित सर्व बाबींबाबत अधिनियमातील कलम १६, १७ व ३१ अन्वये सर्व शाळांमध्ये उपलब्ध करून द्यावयाच्या सोयी सुविधांची अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षणाधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणून तसेच सदर अधिनियमातील कलम २३ नुसार तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्त करणेबाबत अधिसूचनेमध्ये नमूद केलेले आहे. याशिवाय राज्यस्तरावर देखील

तक्रार निवारण अधिकारी नियुक्त करावयाचा आहे.

तसेच उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय ८ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. अपंग २०१३/प्र. क्र. २०१/ अ.क.२ दि.२०/०२/२०१९ अन्वये दिव्यांग व्यक्तीसाठी महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण २०१८ ची अंमलबजावणी करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला असून समावेशित शिक्षणाला प्राधान्य दिलेले आहे.

सद्य:स्थितीत समग्र शिक्षा अंर्तगत समावेशित शिक्षण उपक्रमाची अंमलबजावणी जिल्हा व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये सुरू आहे. समावेशनामध्ये केवळ विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश नसून इतर आजारामुळे शालेय शिक्षणात येणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यामुळे ज्या-ज्या बालकांना शिक्षणात आव्हाने येतात त्यांची आव्हाने कमी करुन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी मानवी अधिकारानुसार कोणताही पक्षपात, भेदभाव न होता सार्वत्रिक मानवता भाव निर्माण करणे व सर्व मुले शिकू शकतात, ही भावना दृढ करण्यासाठी समावेशानाबाबतची संकल्पना समतेतूनच गुणवत्तापुर्ण समानता प्रस्तापित करावयाची आहे. त्यानुषंगाने सर्व जिल्हा व महानगरपालिकेतील शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयाद्वारे दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६ (The Rights of Persons with Disability Act, २०१६) विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबत प्रकरण-३, शिक्षण कलम १६, १७ व प्रकरण ६ कलम ३१ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) आणि महानगरपालिका स्तरावर शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांची नोडल अधिकारी तसेच सदर अधिनियमातील कलम २३ नुसार तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्त करणे तसेच राज्यस्तरावर देखील कलम २३ नुसार तक्रार निवारण अधिकारी नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

दि. २८ डिसेंबर, २०१६ रोजी केंद्र शासनाद्वारे Right of Person With Disability (RPWD) Act, २०१६ अमलात आला आहे. या अधिनियमातील प्रकरण, २ कलम -३ पक्षपात व भेदभाव न करणे, प्रकरण-३, शिक्षण कलम १६, १७ व प्रकरण ६ कलम ३१ अन्वये RTE Act, २००९ नुसार विशेष गरजा असणाऱ्या बालकांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता २१ प्रकारातील विशेष गरजा असणाऱ्या सर्व वरील नमूद दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणावयाचे आहे. त्यानुषंगाने राज्यात सदर अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अधारे राज्यातील सर्व जिल्हा, महानगरपालिका कार्यालयातील शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.) आणि महानगरपालिका स्तरावर शिक्षणाधिकारी/ प्रशासन अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून तसेच सदर अधिनियमातील कलम २३ नुसार तक्रार निवारण अधिकारी नियुक्त करण्यात येत आहे. तरी शिक्षणाधिकारी (प्राथ. / माध्य.) यांनी संदर्भिय अधिनियमातील

कलमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. यासाठी सुलभ संदर्भासाठी दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६ (The Rights of Persons with Disability Act, २०१६) विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबत प्रकरण-३, शिक्षण कलम १६ व १७ मधील बाबी पुढील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या आहेत.

१) प्रकरण ३ शिक्षण कलम १६ च्या प्रयोजनार्थ :- राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शासकीय, खाजगी अनुदानित व खाजगी विनाअनुदानित मान्यता प्राप्त सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना समावेशित शिक्षणाद्वारे शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शालेय प्रवेश व त्या शाळांमध्ये सोयी सुविधा उपलब्ध करून देणेबाबत अंमलबजावणी करणे.

१.१) विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव होणार नाही अशा नजिकच्या नियमित शाळेत प्रवेश देणे व खेळ आणि मनोरंजनात्मक उपक्रमांमध्ये इतरांसोबत समान सहभागाची संधी समतात्मक दृष्टीकोनातून मिळवून देण्यात यावा.

१.२) शाळा, इमारती व परिसरांमध्ये संचारमुक्त अडथळा विरहित वातावरण निर्माण करण्यात यावा.

१.३) विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजेनुसार व्यवस्था व शैक्षणिक सहाय्य व सहाय्यभूत सेवा पुरविण्यात याव्यात.

१.४) विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त शैक्षणिक व सामाजिक विकासाचे सातत्य राखले जाईल अशा प्रकारचे वैयक्तिक सहाय्य त्यांना देऊन समावेशित शिक्षणाची ध्येय साध्य करण्यात यावीत.

१.५) अंध, बधीर किंवा एकापेक्षा जास्त दिव्यांगत्व आहेत अशा विद्यार्थ्यांना संभाषण करण्यास सुलभ होईल अशा भाषा व संदेश वहनाचे माध्यमांचा उपयोग करण्यात यावा.

१.६) प्रारंभिच्या कालावधीतच शिघ्र ओळख करुन विद्यार्थ्यांना असणारी नेमकी अध्ययन अक्षमता (अध्ययनातील आव्हाने) ओळखून त्यांच्या अध्ययन शैलीनुसार सुलभ अशा आधुनिक अध्यापन पध्दती व मुल्यांकन पध्दतींचा वापर करुन त्यांचे शिक्षणातील अडथळे कमी करण्यात यावेत.

१.७) प्रत्येक विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्यांचा शिक्षणातील आदरयुक्त सहभाग, अध्ययन शैलीनुसार अध्ययन दर व त्यांच्या प्रगतीच्या नोंदी इत्यादीबाबत सनियत्रण नियमित ठेवण्यात यावेत.

१.८) विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना वाहतुक व अतितीव्र स्वरूपातील अतिआवश्यक मदतीची गरज असलेल्या विद्यार्थ्यांस मदतनीसाची सुविधा पुरविण्यात यावीत.

वरील प्रकरण ३ शिक्षण कलम १६ अन्वये नमूद असलेल्या बाबींची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी कलम १७ मध्ये समावेशित शिक्षणास प्रोत्साहन व सुविधा देण्यासाठी विशिष्ट

उपाययोजनाचे प्रयोजन पुढील प्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे. त्याबाबतची प्रभावी अंमलबजावणी करावी.

२) प्रकरण ३ शिक्षण कलम १७ च्या प्रयोजनार्थ :- प्रकरण ३ शिक्षण कलम १६ अन्वये नमूद असलेल्या बाबींची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी कलम १७ मध्ये समावेशित शिक्षणास प्रोत्साहन व सुविधा देण्यासाठी विशिष्ट उपाययोजनाचे प्रयोजन पुढील प्रमाणे करण्यात आलेले आहे. त्याबाबतची प्रभावी अंमलबजावणी करावी.

२.१) शाळेत जाणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे प्रत्येक ५ वर्षामध्ये सर्वेक्षण करून विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे त्यांची तपासणी करणे आणि त्यांना आवश्यक असणाऱ्या गरजांची निश्चिती करणे व त्याप्रमाणे सुविधा मिळण्याबाबतची पुर्तता करणे. (सदर अधिनियम निर्गमित झाल्यापासुन पहिला सर्वे हा २ वर्षाच्या आत होईल असे पहावे व त्याचा पुर्वनियोजित आराखडा तयार करावा.

२.२) पुरक प्रशिक्षण संस्थांची स्थापना करण्यात यावी.

२.३) सेवा अंतर्गत शिक्षक व विशेष शिक्षक जे विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना सांकेतीक भाषा, ब्रेल मधून शिक्षण देतात तसेच बौधात्मक अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्यापन करतात अशा विशेष शिक्षकांना प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित करावेत.

२.४) सर्व शाळांना मदत होण्यासाठी व्यवसायिक तज्ञांना व कर्मचारी यांना समावेशित शिक्षणाच्या दृष्टीकोनातून प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित करावेत.

२.५) पुरक संसाधन केंद्र निर्मिती करणे जेणे करून सर्व शाळांना / संस्थांना शैक्षणिक सहाय्य करण्यास मदत होईल.

२.६) आपले दैनदिन संभाषन सर्वांन सोबत करण्यास व समजण्यास मदत होईल अशा पर्यायांचा उपयोग करणे जसे सांकेतीक भाषा व ब्रेलचा उपयोग करणे व पूरक तंत्राचा व साहित्यांचा उपयोग करणे जेणे करून त्यांना समाजात वावरण्यास मदत होईल.

२.७) निधारित झालेल्या विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना (वयाच्या १८ वर्षापर्यंत) मोफत पुस्तके इतर शैक्षणिक साहित्य साधने योग्य उपकरणे उपलब्ध करून द्यावेत.

२.८) शिष्यवृत्ती पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना दिव्यांगाच्या प्रमाणपत्राच्या निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार शिष्यवृत्ती मिळवून देण्यात यावेत.

२.९) योग्य अभ्यासक्रम सुलभीकरण व परिक्षा पध्दतीमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अनुकूलन करणे. (Modification करणे) अतिरिक्त वेळ देणे, लेखनिक देणे, द्वितीय व तृतीय भाषा विषयांमध्ये सुट देणे.

२.१०) अध्ययन अध्यापन प्रक्रिया विकसीत करण्यासाठी संशोधन करण्यात यावे.

२.११) आवश्यकतेनुसार आवश्यक इतर बाबींकरिता नियोजन करून काम करणे.

३) दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६ (The Rights of Persons with Disability Act, २०१६) विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबत प्रकरण-३, शिक्षण कलम १६, १७ व ३१ मधील बाबींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) आणि महानगरपालिका स्तरावर शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांची नोडल अधिकारी व तक्रार निवारण अधिकारी तसेच राज्यस्तरावर सहसंचालक (प्रशासन), शिक्षण आयुक्तालय, पुणे यांची तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०७३०१२२११०७७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Vandana Krishna
Date: 2019.07.30 12:27:15 +05'30'

**( वंदना कृष्णा )**
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई.
३) मा. सभापती, विधान परिषद, यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
४) मा, अध्यक्ष, विधानसभा, यांचे खाजगी सविच, विधानभवन, मुंबई.
५) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
६) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव.
७) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१५) आयुक्त, दिव्यांगजन कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१७) अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
२०) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
२१) संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, संचालनालय, मुंबई.
२२) सहसंचालक / उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे सर्व.
२३) अध्यक्ष/सचिव, आय.सी.एस.ई.,नवी दिल्ली.
२४) अध्यक्ष/सचिव, केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळ.
२५) विभागीय अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, सर्व विभाग.
२६) विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, सर्व विभाग.
२७) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
२८) विभागीय आरोग्य सेवा उपसंचालक, सर्व विभाग.
२९) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये, सर्व
३०) अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालय (सर्व संबंधित रुग्णालये)
३१) संचालक, ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ फिजिकल मेडिसन ॲन्ड रिहॅबिलीटेशन हाजी अजी मुंबई.
३२) संचालक, अलीयावर जंग राष्ट्रीय श्रवण दिव्यांगजन संस्था, बांद्रा, मुंबई.
३३) अधिष्ठाता, केईएम रुग्णालय, मुंबई,
३४) अधिष्ठाता, बा.य.ल नायर रुग्णालय, मुंबई.
३५) अधिष्ठाता, लो.टि. बैद्यकिय महाविद्यालय, सायन रुग्णालय, मुंबई.
३६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर), जिल्हा परिषद, सर्व.
३७) जिल्हा शल्य चिकित्सक, सर्व
३८) जिल्हा आरोग्य अधिकारी सर्व.
३९) वैद्यकिय अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय, सर्व.
४०) प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था सर्व.
४१) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका.
४२) शिक्षणाधिकारी/प्रशासनाधिकारी, महानगरपालिका, सर्व.
४३) निवड नस्ती, एस-६.